सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई

# नागरीकांची सनद

सन २०२२

# महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई
# नागरीकांची सनद

दोन किंवा अधिक परस्पर विरोधी पक्षकारांतील वादविवादाचे निवारण करण्यासाठी उभारलेली संस्था म्हणजे न्यायालय.

मुंबई तसेच महाराष्ट्र राज्याच्या जिल्हयातील सर्व न्यायालये व मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे न्यायालय व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व महानगर दंडाधिकारी न्यायालये हे महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या अंतर्गत येतात.

महानगर दंडाधिकारी न्यायालय हे मुंबई इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालय अधिनियम १८१० अंतर्गत Presidency Magistrate Court, Bombay या नावाने स्थापन झालेले आहे. या न्यायालयातील सर्व कामकाज मुख्य इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालय अधिनियम १८१०, फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ (१९७४ चा २ रा कायदा) ०१ एप्रिल १९७४ रोजी लागू झाल्यानंतर ही न्यायालये मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालये, मुंबई म्हणून ओळखली जातात.

माननीय श्री. सी. पी. कूपर (बार-एट-लॉ) हे १८७८-१८९५ या काळात पहिले मुख्य प्रेसीडेंसी मॅजिस्ट्रेट होते.

माननीय श्री. एम. एम. ध्रुव (एम.ए., एल. एल. बी.) हे १९७२ ते १९७७ या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये पहिले मुख्य महानगर दंडाधिकारी होते.

**या कार्यालयाची रचना व कार्ये यांचा तपशील**

माननीय उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखाली, मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, एस्प्लनेड, मुंबई येथे कार्यरत आहे. माननीय प्रभारी मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई श्री. एम. आर. ए. शेख हे सध्या कार्यालयाचे प्रमुख असून त्यांच्या नियंत्रणाखाली १४ अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी व ६० महानगर दंडाधिकारी यांची न्यायालये बृहन्मुंबईत विविध ठिकणी विखुरलेली आहेत. एस्प्लनेड, माझगांव (सध्या शिवडी येथे), गिरगांव,

शिंदेवाडी, दादर, बांद्रा, अंधेरी, बोरीवली, मुलुंड, विक्रोळी, कुर्ला, बॅलार्ड पियर, सी.एस.एम.टी. रेल्वे, मुंबई सेंट्रल रेल्वे, विले-पार्ले, बाल न्यायालय उमरखाडी, मुंबई या ठिकाणी ही न्यायालये आहेत.

एस्प्लनेड न्यायालयीन इमारत व गिरगांव न्यायालयीन इमारत यांस 'सांस्कृतिक वारसा' म्हणून दर्जा प्राप्त आहे. न्यायालयांचे कामकाज खाली दिलेल्या वेळेत चालते.

**न्यायालयाची वेळ** - सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.४५ वाजेपर्यंत, जेवणासाठी वेळ- दुपारी ०२.०० ते ०२.४५

**कार्यालयाची वेळ** - सकाळी १०.३० ते संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत, जेवणासाठी वेळ - दुपारी ०२.०० ते ०२.३०

**कार्यालयीन सुट्टया** - रविवार, दुसरा व चौथा शनिवार, व मा. उच्च न्यायालयाने मान्यता प्राप्त दिलेल्या इतर वार्षिक सुट्टया.

या व्यतिरिक्त प्रत्येक सुट्टीच्या दिवशी पोलिस रिमांडचे काम पाहण्यासाठी एस्प्लनेड, दादर, बोरीवली व बांद्रा न्यायालयीन केंद्रात प्रत्येकी एक सुट्टीचे रिमांड कोर्ट चालविण्यात येते तर बाल गुन्हेगार यांच्यासाठी बाल न्यायालय, डोंगरी येथे एक सुट्टीचे रिमांड कोर्ट चालविण्यात येते.

तसेच मुंबई मध्यवर्ती कारागृह, भायखळा कारागृह, तळोजा कारागृह व ठाणे मध्यवर्ती कारागृह मधील बंदी आरोपींना गुन्हा कबूल करावयाचा असल्यास त्यांच्या सोयीसाठी कारागृहात प्रत्येक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी एक 'जेल कोर्ट' चालविले जाते.

या व्यतिरिक्त महाराष्ट्र विधीसेवा प्राधिकरण यांनी आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार दर वर्षी लोक न्यायालय व राष्ट्रीय लोक न्यायालय यांचे आयोजन केले जाते तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या पूर्वपरवानगीने या न्यायालयाच्या अखत्यारीत येत असलेल्या न्यायालयांमध्ये जुन्या केसेस निकाली काढण्याकरीता विशेष मोहिम देखील राबविली जाते.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आखून दिलेल्या वेळापत्रकानुसार मध्यस्थी जागरूकता कार्यक्रम या न्यायालयाच्या अखत्यारित येत असलेल्या १६ न्यायालयीन केंद्रामध्ये राबविला जातो.

त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या वार्षिक कार्यक्रमांनुसार न्यायिक अधिका-यांसाठी वर्षातून तीन वेळा कार्यशाळा घेतली जाते.

**महानगर दंडाधिकारी न्यायालयात प्रामुख्याने दाखल केले जाणारे खटले:**

भारतीय दंडसंहिता आणि इतर फौजदारी कायदयांच्या अंतर्गत या न्यायालयात गुन्हेगारी स्वरूपाची प्रकरणे दाखल होतात व न्यायिक प्रक्रियेच्या अधीन राहून न्यायिक अधिकारी हि प्रकरणे निकाली काढतात.

**खटला (केसेस) दाखल करण्याची पध्दत**

सदर खटल्यांची शहानिशा व विविध नियमांस अनुसरून सदर खटला दाखल केला आहे का, याची तपासणी न्यायलिपिक यांच्या मार्फत केल्यानंतर खटले न्यायालयात सादर केले जातात. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर खटले (चार्जशीट) नोंदणीसाठी नोंदणी विभागात पाठविण्यात येतात. नोंदणी झाल्यानंतर सदर चार्जशीट/खटले न्यायालयाने निश्चित केलेल्या तारखेला त्या त्या न्यायालयामध्ये सुणावणीसाठी येतात.

**महानगर दंडाधिकारी न्यायालये**

| मुख्य शाखा | इतर १५ शाखा |
|---|---|
| एस्प्लनेड, मुंबई-०१ | माझगाव, गिरगाव, दादर, अंधेरी, वांद्रे, बोरीवली, कुर्ला, विक्रोळी, मुलुंड, बॅलार्ड पिअर, सी. एस. टी., मुंबई सेंट्रल, विलेपार्ले, शिंदेवाडी व उमरखाडी बालन्यायालय (डोंगरी) |

## महानगर दंडाधिकारी न्यायालयाची कार्यकक्षा

महानगर दंडाधिकारी न्यायालयामध्ये दाखल होणा-या केसेस ह्या मुंबईतील विविध पोलीस ठाणे अंतर्गत येणा-या अधिकार क्षेत्रानुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे दाखल होतात.

## न्यायालयीन संरचना व त्यांचे कार्यक्षेत्र

| मुख्य महानगर दंडाधिकरी | |
|---|---|
| अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी | महानगर दंडाधिकारी |

| न्यायालयीन केंद्र | न्यायालय क्रमांक | न्यायिक अधिकारी |
|---|---|---|
| १. एस्प्लनेड | १ ले न्यायालय | मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ३ रे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ८ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | १९ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | २३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २८ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ३७ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ४७ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ६४ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| २. सी.एस.एम. टी. रेल्वे | ३५ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| ३. माझगाव (सध्या शिवडी येथे आहे) | २ रे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | १५ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २५ वे न्यायालय (MP/MLA ॲक्ट साठी विशेष न्यायालय) | महानगर दंडाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | ४६ वे न्यायालय (अन्न भेसळ ॲक्ट साठी विशेष न्यायालय) | महानगर दंडाधिकारी |
| | ५४ वे न्यायालय (PITA ॲक्ट साठी विशेष न्यायालय) | महानगर दंडाधिकारी |
| | ५६ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६९ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ७० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **४. बॅलार्ड पिअर** | १६ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ३३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ३८ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| **५. मुंबई सेंट्रल रेल्वे** | ३६ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **६. शिंदेवाडी** (BMC साठी विशेष न्यायालय) | ४१ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ४२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **७. गिरगाव** | ४ थे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | १८ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | १४ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ४० वे न्यायालय (MP/MLA ॲक्ट साठी विशेष न्यायालय) | महानगर दंडाधिकारी |
| **८. दादर** | ५ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ७ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | १३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २९ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **९. कुर्ला** | ११ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | ३० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ४५ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५१ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५७ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५९ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६१ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१०. विक्रोळी** | ३१ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ३४ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ४९ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ७२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ७३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **११. मुलुंड** | २७ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१२. वांद्रे** | ९ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | १२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ३२ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ५८ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ७१ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१३. विले-पार्ले** | ३९ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| (BMC साठी विशेष न्यायालय) | ५५ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१४. अंधेरी** | १० वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २२ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | ४४ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | ४८ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६५ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६६ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | रेल्वे मोबाईल न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१५. बोरीवली** | १७ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | २४ वे न्यायालय | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी |
| | २६ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ४३ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| | ६७ वे न्यायालय (MP/MLA अॅक्ट साठी विशेष न्यायालय) | महानगर दंडाधिकारी |
| | ६८ वे न्यायालय | महानगर दंडाधिकारी |
| **१६. बाल न्यायालय** (डोंगरी) | बाल न्यायालय (शहर) | महानगर दंडाधिकारी |
| | २१ वे न्यायालय (उपनगर) | महानगर दंडाधिकारी |

## प्रशासकीय संरचना

या न्यायालयाचे कामकाज चालविण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई व राज्य सरकारने नियुक्त केलेले अधिकारी/ कर्मचारी/ कंत्राटी कर्मचारी व त्यांची उतरंड खालीलप्रमाणे आहे.

## मुख्य महानगर दंडाधिकारी

| न्यायालयीन विभाग | आस्थापना विभाग |
|---|---|
| न्यायिक अधिकारी | प्रबंधक तथा जन माहिती |
| न्यायालयीन लिपिक | उप- प्रंबधक |
| दुभाषी | कार्यालयीन अधिक्षक |
| स्वीय सहाय्यक | सहाय्यक प्रबंधक तथा |
| लघुलेखक (उच्च/निम्न श्रेणी) | सहा. जनमाहिती अधिकारी |
| वर्ग-३ कर्मचारी | मुख्य लिपिक |
| वर्ग-४ कर्मचारी | सहाय्यक अधिक्षक |
| | वर्ग-३ कर्मचारी |
| | वर्ग-४ कर्मचारी |

## कंत्राटी कर्मचारी

| कोर्ट मॅनेजर | वरिष्ठ प्रणाली अधिकारी, |
|---|---|
| | प्रणाली अधिकारी, |
| | सफाई कर्मचारी |

## मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुख्य शाखा येथे कार्यरत असणारे वेगवेगळे विभाग

### आस्थापना विभाग

सदर विभागात कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेसंबंधातील सर्व कामकाज केले जाते.

### पत्रव्यवहार विभाग

आस्थापना विभागातील सर्व प्रकारचे येणारे टपाल स्वीकारणे व इतर पत्रव्यवहार याची नोंद आवक व जावक पुस्तकात करण्यात येते.

### रिट विभाग (Writ Section)

माननीय सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालय येथून येणारे रिट संबंधित न्यायालयात पूर्ततेसाठी पाठविले जातात व पूर्तता करून आलेले रिट संबंधित न्यायालयाकडे पाठविले जातात.

### समन्स विभाग (Execution of Summons/Notice)

महाराष्ट्र व इत्तर राज्यातील न्यायालये, माननीय सत्र न्यायालये, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय येथून येणारे समन्स, नोटीस व वॉरंट, संबंधित पोलीस ठाणेस बजावणीसाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयास पाठविले जातात.

### सांख्यिकी विभाग (Statement Section)

न्यायालयात दाखल होणारे खटले व निकाली खटले यांची माहिती आकडेवारीनुसार वेगवेगळया कलमांतर्गत मोजणी करून मा. उच्च न्यायालयास महिना अखेरीस सादर केली जाते.

**गोपनीय विभाग**

या विभागात गोपनीय पत्रव्यवहार केला जातो.

**नोंदणी विभाग**

या आस्थापनेच्या सर्व न्यायालयीन केंद्रामध्ये नोंदणी विभाग कार्यरत असून न्यायालयात दाखल होणा-या खटल्यांची नोंद केली जाते.

**रोख विभाग**

या विभागात रोखपाल, सहाय्यक अधिक्षक व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली जाते.

सदर विभागात न्यायालयीन आदेशांप्रमाणे जामीन रक्कम व दंड आकारणी रक्कम यांचा भरणा केला जातो. तसेच न्यायालयीन आदेशाप्रमाणे भरणा केलेली रक्कम विरूध्द पक्षकारास प्रदान करण्यात येते.

**अभिलेख विभाग** (Record Section)

मध्यवर्ती अभिलेख विभाग हे माझगाव न्यायालयीन केंद्र येथे कार्यरत आहे. सदर विभागात न्यायालयाने निकाली काढलेले खटले त्यांच्या निकाली तारखेनुसार जतन करण्यात येतात. सदर खटल्यामध्ये एखाद्या पक्षकारास खटल्याची तपासणी करावयाची असल्यास पक्षकार योग्य शुल्कासह मा. अतिरिक्त महानगर दंडाधिकारी, २ रे न्यायालय, माझगांव यांना अर्ज करून सदर खटल्याची तपासणी करू शकतो. तसेच सदर विभागात दाखल झालेल्या खटल्यातील पुराव्यासंबंधातील कागदपत्रे न्यायालयीन आदेशानुसार संबंधित न्यायालयाला परत केले जातात.

**मध्यस्थी केंद्र**

न्यायालयातील प्रलंबित खटले/ प्रकरणे पक्षकारांच्या संमतीने तडजोडीने मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयाच्या आदेशाने मध्यस्थी केंद्राकडे पाठवले

जातात. त्यानंतर सदर प्रकरणात मध्यस्थी न्यायाधीश/ विधिज्ञ मध्यस्थी यांची नेमणूक केली जाते. सदर मध्यस्थी दोन्ही पक्षकारांच्या बाजु ऐकून सामोपचाराने सदर प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करतो व तसा अहवाल संबंधित न्यायालयात सादर करतो. जरी मध्यस्थीने वाद मिटला नाही तरी त्याचा परिणाम हा प्रकरणाच्या गुणवत्तेवर मुळीच होत नाही.

## सुकून केंद्र

न्यायालयातील प्रलंबित खटले/ प्रकरणे पक्षकारांच्या संमतीने तडजोडीने मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयाच्या आदेशाने सुकून केंद्र, एस्प्लनेड येथे पाठवले जातात. त्यानंतर सदर प्रकरणात मध्यस्थी म्हणून सामाजिक कार्यकर्ती यांची नेमणूक केली जाते. सदर मध्यस्थी दोन्ही पक्षकारांच्या बाजु ऐकून सामोपचाराने सदर प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करतो व तसा अहवाल संबंधित न्यायालयात सादर करतो. जरी मध्यस्थीने वाद मिटला नाही तरी त्याचा परिणाम हा प्रकरणाच्या गुणवत्तेवर मुळीच होत नाही.

## ई-सेवा केंद्र

१. न्यायालयीन खटल्याची स्थिती.
२. ई- फाईलींग करिता मूळ तक्रार स्कॅन करणे, ई- सही समाविष्ट करणे.
३. आधारकार्ड आधारित डिजीटल स्वाक्षरी लागू करण्यास मदत करणे.
४. अॅन्ड्राईड आणि आय.ओ.एस. ई- कोर्टस् मोबाईल अॅप डाऊनलोड करण्यास सहाय्य करणे.
५. रजेवर असलेल्या न्यायाधीशांचा पदभार आणि प्रभारी न्यायालयाबाबत माहिती.
६. न्यायालयाचे स्थान आणि खटल्यांची यादी या संदर्भात माहिती.
७. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय विधी सेवा समिती आणि सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समितीकडून विनामूल्य कायदेशीर सेवा याविषयी मार्गदर्शन.

८. दूरदृश्य प्रणाली (व्हर्चुअल) न्यायालयाच्या माध्यमातून ट्राफिक चलान व इतर सौम्य गुन्हे ऑनलाईन तडजोडीने मिटवण्याची सुविधा.
९. इलेक्ट्रॉनिक न्यायालय (ई-कोर्ट) प्रकल्पांतर्गत डिजीटली उपलब्ध असलेल्या सुविधांच्या संदर्भात माहिती.
१०. दूरदृश्य प्रणाली (व्हीडीओ कॉनफरन्स) माध्यमातून खटल्याच्या सुनावणीबाबत सहाय्य.
११. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे न्यायालयीन आदेश आणि निर्णयाची प्रत उपलब्ध करून देण्याची सुविधा.

## मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयाचे ध्येय/ दृष्टीकोण

पोलीसांनी / पक्षकारांनी दाखल केलेल्या फौजदारी, समरी, EOW, Custom, CBI प्रकरणांवर लवकरात लवकर सुनावणी घेऊन निर्णय देणे व तद्नुषंगिक येणारी इतर कामे यांचा शक्यतो त्वरीत निपटारा करून घेणे. प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करणे. तसेच पोलीसांनी अटक केलेल्या आरोपीचे रिमांड घेणे, जामीन अर्जावर निर्णय घेणे आणि कलम १६४ फौजदारी दंडसंहिता नुसार जबाब नोंद करणे.

## मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयातर्फे करण्यात येणारी शासकीय कामे

१. केस दाखल/ समन्स / वॉरंट बजावणी
२. न्यायनिवाडा
३. अंमलबजावणी.
४. साक्षांकित प्रत.
५. संपलेले खटले जतन करणे.

## मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयार्फत राबविण्यात येणा-या योजना

१. मध्यस्थी.
२. लोक अदालत.

**मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयार्फत पुरविण्यात येणा-या सेवा**

१. ई-सेवा अंतर्गत विविध सेवा.
२. न्यायनिवाड्यासंबंधी कागदपत्रांची साक्षांकित प्रत वेळेत उपलब्ध करून देणे.
३. माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेली देय माहिती वेळेत पुरविणे.
४. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृह, उदवाहन सेवा.
५. दिव्यांग व्यक्तीसाठी सुगम्य भारत योजना, स्वतंत्र प्रसाधनगृह.
६. प्रथमोपचार पेटी.
७. वाहनतळ.

मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयात कार्यरत असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या संबंधित एकत्रित सर्व माहिती मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयाच्या https://districts.ecourts.gov.in/mumbai-cmm-court या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

20/06/22

प्रभारी मुख्य महानगर दंडाधिकारी
एस्प्लनेड, मुंबई.